ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# ओलीताची शेती केल्याने लघुकृषकाच्या आर्थिक स्तर वाढला

**प्रा. संजय फुलकर**
*सहयोगी प्राध्यापक,*
*कुंभलकर समाजकार्य सांध्यकालीन*
*महाविदयालय, राजीव नगर नागपूर*

**Abstract.:**
*शेतकरी हा जगाचा पोषींदा आहे शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय आहे. आजही ६६ टक्के लोक शेती हा मुख्य व्यवसाय करतात. शेतीमधून कुटूंबाचा जीवन निर्वाह होईल एवढे उत्पन्न मिळत नाही म्हणून ओलीताची शेती केली तर लघुकृषकाचा आर्थिक स्तर वाढून त्यांचे जीवन समृध्द होईल.*

**Keywords.:**
*शेती, लघुकृषक, ओलीताची शेती, उत्पन्न, आर्थिक स्तर, जिवन*

**प्रस्तवाना**

शेतकऱ्याने जीवन साधन मिळविण्यासाठी किंवा धंदा म्हणून स्वत:च्या शेतावर चालविलेला व्यवसाय अशी सरळ मनाने शेतीची व्याख्या करता येईल. भागौलीक व पाण्याच्या उपलब्धतेवरून कोरडवाहू शेती व ओलीत शेती व पडीत शेती असे प्रकार पडतात तर शेतामधून काडावयाचा उत्पादनावरून शेतीचे ३ सरळ भाव शेती, पशुधन प्रधान शेती, मत्स शेती, इ निरनिराळे प्रकार अस्तित्वात आलेले आहेत. तसेच सिचनांच्या उपलब्धतेनुसार बागायती शेती, जिराईत शेती, असेही प्रकार पडतात. खताच्या वापरानुसार सेद्रिंय शेती रसायनिक शेती असे प्रकार सुद्धा असत्विात आले आहेत. स्थुलमानानुसार नैसर्गिक आणि आर्थिक घटकामूळे शेतीच्या प्रकारात बदल होतात. (www-marathi world.com शेतीचा प्रकार २३/०१/२२)

शेती म्हणजे अन्न, गवत, कापडाचे तंतू, प्राणी, मद्य तसेच वनस्पती याचे व्यवस्थापित उत्पादन होय. (पाटील विश्वास, कोरडवाहू शेती ३ जानेवारी २०१५)

कोरडवाहू शेती हा प्रश्न फक्त त्या शेतकऱ्याच्या जगण्या मरण्याशी संबंधित नाही. तो सगळया समाजाचा प्रश्न आहे त्यामूळे कोरडवाहू शेतकऱ्यापेक्षाही ही इतर समाजाला धोरणकर्त्यांना जास्त तिव्रतेने समजला पाहिजे. कोरडवाहू शेती, शेतकऱ्याचे प्रयत्न त्यांच्या अडचणी व शासनाचे धोरण याची चिकित्सक मांडणी केली पाहिजे. शेतीची सघ:स्थिती ढोबळमनाने कशी आहे शासनापासून समाजापर्यंत व व्यवस्थेपासून धोरण निश्चिती पर्यंत आता कोरडवाहू शेती हा विषय कुणाच्या खाजगीतील नाही. कॉग्रेस आघाडीच्या मागच्या सरकारने कोरडवाहू मिशन हाती घेतले परंतु अशी मिशन हाती घेतली जातात. त्यावर कोटयावधी रूपये खर्च होतात व पूढे त्या मिशनचे काय होते. हे शेतकऱ्यानाच नव्हे तर सरकारलाही समजत नाही.

महाराष्ट्र राज्यात कोरडवाहू शेतीचे जवळपास ८५ टक्के क्षेत्र आहे पावसाची सरासरी ७५० मि.मी. पेक्षा कमी असलेला भाग म्हणजे अवर्षण प्रवण क्षेत्र पावसाची उशिरा सुरूवात व अपूरी मात्रा पिक वाढीच्या कालावधीत ३—५ आठवडयाचा खंड हे बदलत्या हवामानाची वैशिष्टये आहे. अशा परिस्थितीत कोरडवाहू शेतीचे उपयुक्त तंत्र वापरून काही अंशीनिश्चित उत्पादन मिळविता येते. नैसर्गिक घटक जसे जमिनी पाणी सूर्यप्रकाश व हवा इत्यादीचा कार्यक्षम उपयोग करून घेण्यासाठी जमिन व्यवस्थापन आणि पिक पद्धतीने योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.(www.vnmkvtech.blogspot.com कोरडवाहू शेतीचे व्यवस्थापन १९ फेब्रुवारी २०१७)

पिके आणि शेतीचा प्रकार हे जमिन आणि भुरचना यावर अवलंबून असातात. शेतीचे प्रकार किती आहे हा प्रश्न प्रामुख्याने विचारला जातो. सेद्रिंय शेतीलाच जैविक तंत्रज्ञान असे नाव वैज्ञानिकानी दिले आहे. या शेतीला भविष्यातील शेती म्हटले जाते. मातीचे प्रकार प्रामुख्याने हल्की, मध्यम व भारी असे तीन प्रकार पडतात. मातीचा, रंग, मातीचा पोत इत्यादी नुसार मातीचे विविध प्रकार पडतात. (ebachatgat.com शेतीचे प्रकार)

महाराष्ट्राच्या प्राकृतिक रचनेत विविधता आढळते. त्याचप्रमाणे हवामानातील विविध अविष्कारातही विभीन्नता आहे. त्यामुळे साहजिकच महाराष्ट्रात एकाच प्रकारची शेती करणे शक्य असत नाही. मशागत करण्याच्या पद्धतीमध्ये प्रादेशिक घटकाच्या मुख्यतेवरून प्रभाव पडतो.

**महाराष्ट्रात शेतीचे पूढील प्रकार आहेत.**

१. ओलीत शेती
२. आद्र शेती
३. बागायत शेती
४. कोरडवाहू शेती किंवा जिराईत शेती
५. पायऱ्या पायऱ्यांची शेती

६. स्थलातरीत शेती (सांवत, निलेश; महाराष्टातील कृषी प्रकार २१ नोव्हेंबर २०११ facebook.com)

आज लघुकृषकाच्या कुटुंबातील सदस्य शेतीमध्ये तर काम करतात त्यामानाने शेती कमी असल्यामुळे त्यातून निघणारे उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांना इतर ठिकाणी सुद्धा काम करावे लागते. आणि त्या उत्पनातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. शेतीचे प्रमाण कमी असल्यामुळे कुटूंबाचे सर्व सदस्यांना वर्षभर शेतीमध्ये काम मिळत नाही. त्यामुळे काही सदस्य मजूरी व्यवसाय किंवा इतर कामा करतांना दिसून येते.

**अभ्यासाचे उद्‌देश :**

१. ओलीताची शेती केली तर शेतकऱ्यांचा विकास साधता येईल याचा अभ्यास करणे.
२. शेतीमध्ये दोन पेक्षा अधिक पिके घेतले तर शेती ही फायदयाची होईल याचा अभ्यास करणे.
३. ओलीताची शेती करण्याकरीता शासनाव्दारा राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मुल्यांकन करणे?

**अध्ययनाची उपकल्पना** :

१. ओलीताची शेती करत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होत नाही.
२. शेतीमध्ये दोन पेक्षा अधिक पिके घेत नसल्यामुळे शेतीत फायदा होत नाही.
३. ओलीताची शेती करण्याकरीता शासनाव्दारा सबसिडी दिल्यास शेती ही फायदयाची होईल.

**संशोधन पध्दती** :

अध्ययनाचे विश्व व क्षेत्र : प्रस्तुत अध्ययनात पुर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा व गोंदिया येथील २९२ लघु कृषकांना समाविष्ट करण्यात आले. व हे अध्ययन डिसेंबर २०२१ ते मार्च २०२२ या कालावधीत करण्यांत आले.

प्रस्तुत अध्ययनात वर्णनात्मकत आराखडयाचा उपयोग करण्यातना आला.

प्रस्तुत अध्ययनात गैरसंभावता नमुना निवड पध्दतीतील सोयीस्कर नमना निवड व्दारे पुर्व विदतीर्भातील २९२ लघू कृषकांना समाविष्ठ करण्यात आले.

प्रस्तुत अध्ययना मध्ये शेतीचा प्रकार व कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न किती यासंबधाची व्दीचल सारणीच्या प्राप्त माहीतीचे विश्लेषण खालील प्रमाणे.

| अ.क्र | शेतीचा प्रकार | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ४०,००० रू. च्या आत | ४१,००० रू ते ८०,००० रू. | ८१,००० रू ते १,२०,००० रू | १,२१,००० ते १,६०,००० रू | १,६१,००० रू पेक्षा अधिक | |
| १ | ओलीत | ८६ (२९.५%) | ५८ (१९.९%) | २८ (९.६%) | १६ (५.५%) | १२ (४.१%) | २०० (६८.५%) |
| २ | कोरडवाहू | २७ (९.२%) | २७ (९.२%) | १० (३.४%) | ७ (२.४%) | १० (३.४%) | ८१ (२७.७%) |
| ३ | पडीत | २ (०.७%) | ३ (१.०%) | ६ (२.१%) | ० (०%) | ० (०%) | ११ (३.८%) |
| | एकूण | ११५ (३९.४%) | ८८ (३०.१%) | ४४ (१५.१%) | २३ (७.९%) | २२ (७.५%) | २९२ (१००%) |

(Chi.Sq.=19.862, df = 8, CC = 0.252, N=292, $P > 0.05$)

उपरोक्त सारणीत स्वतंत्र चलामध्ये शेतीचा प्रकार दर्शविलेला असून यात ओलित, कोरडवाहू, पडित अशा ३ बाबीचा समावेश केलेला आहे. तर त्याच्यांवर अवलंबित चलामध्ये कुटूंबाचे सरळ मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न नमूद केले असून त्यात ४००००/— रू. च्या आत, ४१,०००/— रू. ते ८०,०००/—, ८१,००० रू ते १,२०,००० रू, १,२१,००० ते १,६०,००० रू, १,६१,००० रू पेक्षा अधिक अशा ५ पर्यायाचा समावेश केलेला आहे. ओलीत शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या २०० असून त्यांचे प्रमाण ६८.५ टक्के आहे. त्यात कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न ४०,०००/— च्या आत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण २९.५ टक्के आहे. तर ४१,०००/— ते ८०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १९.९ टक्के आहे. व ८१,०००/— ते १,२०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९.६ टक्के आहे. आणि १,२१,०००/— ते १,६०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ५.५ टक्के आहे. व सर्वात कमी १,६१,०००/— रूपये पेक्षा अधिक

कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ४.१ टक्के आहे.

कोरडवाहू शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ८१ असून त्यांचे प्रमाण २७.७ टक्के आहे. त्यात कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न ४०,०००/— च्या आत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९.२ टक्के आहे. तर ४१,०००/— ते ८०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ९.२ टक्के आहे. व ८१,०००/— ते १,२०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ३.४ टक्के आहे. आणि १,२१,०००/— ते १,६०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण २.४ टक्के आहे. व १,६१,०००/— रूपये पेक्षा अधिक कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ३.४ टक्के आहे.

पडित शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ११ असून त्यांचे प्रमाण ३.८ टक्के आहे. त्यात कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न ४०,०००/— च्या आत असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ०.७ टक्के आहे. तर ४१,०००/— ते ८०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण १ टक्के आहे. व ८१,०००/— ते १,२०,०००/— रूपये कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण २.१ टक्के आहे. आणि १,२१,०००/— ते १,६०,०००/— रूपये व १,६१,०००/— रूपये पेक्षा अधिक कुटूंबाचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण एकही आढळून आलेला नाही.

उपरोक्त सारणीच्या विशलेषाणावरून असे स्पष्ट होते की, ओलित शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे सर्वाधिक ६८.५ टक्के आहे. तसेच त्या खालोखाल कोरडवाहू शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे २७.७ टक्के तर पडित शेतीचा प्रकार असणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण ३.८ टक्के इतके आहे.

स्वतत्र्य चल व अवलंबीक चल या दोघांमध्ये सहसंबंध पाहण्याकरीता सांख्यकिय काईवर्ग परिक्षण करण्यात आले, परिक्षणावरुन ८ स्वातंत्र्यांश व ०.२५२ महत्वपुर्ण काईवर्ग मुल्य १९.८६ असून हे तालिका मुल्यापेक्षा जास्त आहे. (Chi.Sq.=19.862, df = 8, CC = 0.252, N=292, $P > 0.05$) याचाच अर्थ असा की, जास्तीतजास्त लघूकृषकाकडे ओलीत शेतीचा प्रकार दिसून येतो. ज्यामुळे त्यांचे उत्पन्न सुद्धा अधिक असल्याचे लक्षात येते. ज्या लघूकृषकाकडे ओलीताच्या शेतीचे प्रमाण आहे ते लघूकृषक दोनपेक्षा अधिक उत्पादन वर्षभरात शेतातून काढतात. त्याचा फायदा त्यांना त्यांच्या कुटूंबांला होतांनी दिसून येतो.

शासन स्तरावर ओलीत शेतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढण्याकरिता सरकारने पाण्याचे योग्य नियोजन करण्याकरिता सर्व लघूकृषकांकडे जनजागृतीचे काम केले पाहिजे. शेतामध्ये पडणाऱ्या पाण्याचे थेंब वाया न जाता तो शेतामध्येच गेला पाहिजे तेव्हाच कोरडवाहू शेतीचे प्रमाण कमी होईल. लघूकृषकाचे आर्थिक उत्पन्न वाढण्याकरिता शेतीशी जोडधंदे उभे करून सर्व लघूकृषकांनी सामुहिक शेतीला प्राधान्य दिले पाहिजे ज्यामुळे शेतीला येणारा खर्च कमी होवून उत्पादनामध्ये भर पडेल.

**सुचना व शिफारसी:**

१. शेती ही फायद्याची करायची असेल तर सरकारनी लघुकृषकांना ओलीताची शेती करण्याकरीता विहिरीसाठी आर्थिक मदत मोठया प्रमाणात करायला पाहिजे.
२. ग्रामिण भागातील सर्व लघुकृषकांनी सामुहिकपणे पाण्याचे योग्य व्यवस्थापन केले तर शेती ही नक्कीच फायद्याची होईल.
३. लघुकृषकांनी पाण्याचे योग्य नियोजन करुन सामुहिकपणे शेती करायला पाहिजे.
४. लघुकृषकांनी ओलीताची शेती करण्याकरीता सर्व शेतकऱ्यांना सहकार्य करायला पाहिजे.
५. सरकारने पाणी अडवा पाणी जिरवा ही बाब शासकिय धोरणमध्ये समाविष्ठ करुन प्रत्येक लघुकृषकाला काटेकोर पणे पालन करायला लावणे.

**संदर्भ :—**

१. पाटील विश्वास, कोरडवाहू शेती ३ जानेवारी २०१५
२. सांवत, निलेश; महाराष्टातील कृषी प्रकार २१ नोव्हेंबर २०११ बिमइववाण्बवउ
३. www-marathi world.com शेतीचा प्रकार २३/०१/२२
४. www.vnmkvtech.blogspot.com कोरडवाहू शेतीचे व्यवस्थापन १९ फेब्रुवारी २०१७
५. www.ebachatgat.com शेतीचे प्रकार